# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**उल्हासनगर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा मिळणेबाबत**

**(१) २४५३ (२३-१२-२०१४). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनकचरा निवारणार्थ प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेस २० किलोमीटरचे दरम्यान ५ एकर जागा देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिकेने असा आवश्यक प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली जात आहे,

(४) नसल्यास, विलंबास कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-११-२०१५) :**(१) महानगरपालिका/नगरपालिका यांना नागरी घनकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी आवश्यक असलेली महानगरपालिका/नगरपालिका हद्दीतील, तसेच हद्दीबाहेरील शासकीय जमीन जागेची उपलब्धता विचारात घेऊन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील तरतूदींनुसार मंजूर केली जाते.

(२), (३) व (४) मौजे कांबा, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. ४४ व इतर मधील क्षेत्र २५-००.० हे.आर या मिळकतीचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेस आगावू ताबा देण्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २१ ऑगस्ट, २००४ रोजी आदेश पारीत केले होते. तथापि, सदर जमीन ताब्यात घेण्याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेकडून प्रतिपाद मिळत नसल्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ४ जानेवारी, २००८ च्या आदेशान्वये आगावू ताबा देण्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २००४ चे आदेश रद्द केले आहेत.

आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी अंबरनाथ तालुक्यातील मौजे कोहोज खुंटवली, मौजे जांभिवली किंवा मौजे पाले यापैकी एका ठिकाणची जागा घनकचरा

व्यवस्थापनासाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती जिल्हाधिकारी, ठाणे यांना केली असून याबाब जमीन मागणी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तहसिलदार, अंबरनाथ यांना दिले आहेत.

---

**राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने पुणे जिल्ह्यातील खाणपट्टयांना परवानगी नाकारल्याने जिल्हा प्रशासनाचा सुमारे १० कोटींचा महसूल बुडाल्याबाबत.**

**(२) ३५५८ (२२-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने पुणे जिल्ह्यातील ३०० पैकी सुमारे २४७ खाणपट्टयांना माहे नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास परवानगी नाकारली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,परवानगी नाकारल्यामूळे जिल्हा प्रशासनाच्या सुमारे १० कोटींचा महसूल बुडाला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खाणपट्टयांना सुरु करण्याकरीता नव्याने प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, या खाणपट्टयांना परवागनी देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१), (२), (३) व (४) हे खरे नाही. पुणे जिल्ह्यातील एकूण ५४७ दगडखाणीचे प्रस्ताव पर्यावरण अनुमतीकरिता सादर केले असता, ३०० दगडखाण प्रस्तावांना पर्यावरण अनुमती जानेवारी, २०१४ मध्ये प्राप्त झाली. पर्यावरण समितीने उपस्थित केलेल्या बाबींची पूर्तता केल्यानंतर उर्वरित दगडखाण प्रस्तावांना जानेवारी, २०१५ मध्ये पर्यावरण अनुमती प्राप्त झाली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील वर्धा नदीवरील चिंचोली रेती घाटाचा लिलाव नसतानाही रेतीची मोठ्या प्रमाणात चोरी होत असल्याबाबत.**

**(३) ५६७३ (०४-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील वर्धा नदीवरील चिंचोली रेती घाटाचा लिलाव नसतानाही दररोज रात्री सर्रास रेतीची मोठ्या प्रमाणात चोरी रोखण्याबाबत व त्यांच्यावर कारवाई

करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ठाणेदार, मंगरुळ दस्तगीर पोलीस स्टेशन, उपविभाग अधिकारी, चांदूर रेल्वे व उपविभागीय पोलीस अधिकारी, चांदूर रेल्वे यांना वारंवार लेखी निवेदने देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५)** :(१) व (२) मा.स्थानिक लोकप्रतिनिधीं यांचे दि.४.३.२०११५ चे निवेदन प्राप्त झाले आहे. वर्धा नदीवरील चिंचोली हा रेतीघाट धामणगांव रेल्वे तालुक्यामध्ये असून स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदनाच्या अनुषंगाने अवैधरित्या रेतीची वाहतूक करणा-या वाहनांवर कारवाई करण्याकरीता नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांचे संयुक्त पथक स्थापन करण्यात आले आहे. तसेच पोलीस विभाग व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सुध्दा कारवाई करण्याकरीता सूचना देण्यात आल्या आहेत.

चांदूर रेल्वे तालुकयामध्ये सन २०१४-१५ या कालावधी मध्ये गौण खनिजाच्या अवैधरित्या उत्खनन/वाहतूकीच्या ९२ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करुन रु. ११,६६,२००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई क्षेत्रातील गुरचरण आणि मसनवट जमीनीवर घरे नियमित करुन मिळणेबाबत**

**(४) ६९१५ (०७-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रातील गुरचरण आणि मसनवट जमिनीवर गोर गरिबांनी घरे बांधली असून अनेक वर्षापासून त्याठिकाणी वास्तव्य करित असून, सदरची घरे अद्याप नियमित करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुरचरण व मसनवट जमीनीवरील घरे नियमित करण्यात यावीत म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.महसूल मंत्री महोदयांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरची घरे नियमित करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्यापही कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-११-२०१५)** :(१) नवी मुंबई क्षेत्रातील मौजे तुर्भे येथील ग.नं. ३७६, ३७७ या सरकारी गुरचरण जमिनीवर, मौजे ऐरोली येथील ग.नं. १५० या मसणवट जागेवर, तसेच मौजे दिघे जेथील स.नं. २३० या स्मशानभूमी असलेल्या जमिनीवर झोपड्यांची अतिक्रमणे आहेत. सदर अतिक्रमण धारकांना सन २०१० मध्ये नोटीसा लागू करण्यात आलेल्या आहेत.

(२) होय.

(३) व (४) सन्माननीय सदस्यांच्या निवेदनातील विनंतीच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त, कोकण यांनी जिल्हाधिकारी, ठाणे व जिल्हाधिकारी, रायगड यांना दिले आहेत.

---

**रायगड जिल्हयातील रेती उत्खन्नाला बंदी असल्याने**
**अवैध रेती वाहतूकीवर निर्बंध आणण्याबाबत**

**(५) ७१६४ (०४-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील रेती उत्खन्नाला बंदी असल्याने रेती वाहतूक करणा-या डंपर्स चालकांवर गुन्हे दाखल करण्याऐवजी अवैध रेती वाहतूकीवर निर्बंध आणण्यासाठी वाहतूकदार मालाकांवर गुन्हे दाखल करावे, अशी मागणी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-११-२०१५) :**(१) व (२) जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे दि. २२ डिसेंबर, २०१४ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने पोलीस अधिक्षक, रायगड, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे, रायगड जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, बंदर अधिकारी यांना उचित कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचेमार्फत निदेश देण्यात आले आहेत.

रेतीचे अवैध उत्खनन व वाहतूकीस पूर्णत: प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मोक्याच्या व सुयोग्य ठिकाणी पोलीस विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग व महसूल विभाग यांचे संयुक्त २४ तास तपासणी/चेक नाके कार्यान्वित करण्यात आले आहेत.

जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आली असून या पथकांनी केलेल्या कारवाईत एप्रिल, २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीत ९५२ प्रकरणांत रु. २,२७,३१,८४६/- तसेच ४५ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ७२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांना त्यांचा हक्काच्या जमिनी देण्याबाबत.**

**(६) ८२९५ (०४-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांना त्यांचा हक्काच्या जमिनी देण्याचा निर्णय माजी मुख्यमंत्री महोदयांनी दोन वर्षापूर्वी घेऊनही अद्याप जमिनी शासनाने त्याच्या नावावर करण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास प्रकरणी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये इंदापूर तालुक्यातील (जि.पुणे) खंडकरी शेतकऱ्यांनी बारामती प्रांत कार्यालयासमोर उपोषण केले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) नाही सदरचे उपोषण खंडकऱ्यांच्या वारसाना वाटप करण्यात आलेले क्षेत्र बदलून मिळण्यासाठी करण्यात आले होते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) २७ खंडकऱ्यांपैकी गट मान्य असलेल्या खंडकऱ्यांमध्ये वाटपाबाबत अंतर्गत वाद चालू असून त्याबाबत चर्चेअंती सर्व मान्यतेने वाटपाबाबत कार्यवाही करण्याचे नियोजित आहे. तसेच रत्नपुरी मळ्यातील जमीन वाटप करावयाच्या राहिलेल्या पात्र माजी खंडकरी शेतकऱ्यांचे अडी अडचणीबाबत संबंधितांशी दि २१ मार्च, २०१५ रोजी उपविभागीय अधिकारी, बारामती इंदापूर उपविभाग यांच्या स्तरावर झालेल्या सभेत ठरल्यानुसार बदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे विचारार्थ पाठविण्यात आला आहे.
(५) अशी बाब नाही.

---

**रामटेक-चिचाळा मार्गावर उत्खननाची मुदत संपल्यानंतरही**
**मुरुमाचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(७) ८६०१ (०४-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक-चिचाळा मार्गावर भोसला देवस्थानची मालकी असलेल्या शेतात शेततळे बनविण्याच्या नावावर जेसीबी आणि पोकलॅण्डच्या सहाय्याने उत्खननाची मुदत संपल्यावर मुरुमाचे उत्खनन सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल विभागाकडून प्रथम १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी ५०० ब्रॉस, नंतर २५ नोव्हेंबर,२०१४ ला २०० ब्रॉस मुरुम उत्खननाची परवानगी ३० नोव्हेंबर,२०१४ पर्यंत देण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुदत संपल्यावर उत्खनन करुन त्याची उचल करणाऱ्या व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-१२-२०१५) :**(१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी मौजे रामटेक येथील स.नं. १९१ मधून अशा प्रकारे मुरुम उत्खननाची परवानगी दिली, हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी चोकशी केली असता, मौजे रामटेक, ता.जि. नागपूर येथील सर्व्हे क्र. १९१ मध्ये उप विभागीय अधिकारी, रामटेक यांनी दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये ५०० ब्रास व दि. २५.११.२०१४ च्या आदेशान्वये २०० ब्रास मुरुम उत्खननासाठी दि. ३० नोव्हेंबर, २०१४ पर्यंत परवानगी दिली होती. रामटेक-चिंचाळा मार्गावर भोसला देवस्थानाची मालकी असलेल्या शेतात शेततळे बनविण्याच्या नावावर जेसीबी आणि पोकलॅण्डच्या सहाय्याने उत्खननाची मुदत संपल्यावर भुरुपाचे उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आले नाही.
मात्र, मौजे रामटेक येथील सर्व्हे क्र. १९१ मध्ये ३४२४ ब्रास मुरुमाचे अवैधरित्या उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने संबंधितांवर रु. ९२,०७,५८४/- एवढया रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, दंडाच्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने विद्युतीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात जिल्हानिहाय विद्युतीकरण समिती अस्तित्वात नसल्याबाबत.

**(८) ९३१० (०४-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने विद्युतीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हानिहाय विद्युतीकरण समिती स्थापन करण्यासंदर्भात परिपत्रक काढून ९ वर्षाचा कालावधी होऊनही कोल्हापूर जिल्ह्यात कमिटीच अस्तित्वात नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१), (२) व (३) शासन निर्णय क्र.जिस्तस-२०१५/प्र.क्र..५२/उर्जा-५, दिनांक २६.३.२०१५ अनुसार जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विद्युत वितरण समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय विद्युत वितरण नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीची प्रथम बैठक दिनांक २५.५.२०१५ रोजी घेण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) मनसर परिसरातील रेतीची मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक सुरु असल्याबाबम**

**(९) ९५१८ (०४-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) मनसर परिसरातील हल्ली रेतीची मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध वाहतूकीचे ट्रक व टॅक्टर ही वाहने भरधाव जात असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अवैध रेती वाहतूकीसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(४) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही. पोलिस विभागाने दिलेल्या अहवालानुसार, अवैध वाहतुकीचे ट्रक व ट्रॅक्टर ही वाहने भरधाव जात असल्याने अपघात झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी तालुका स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. या पथकाने केलेल्या कारवाईत रामटेक तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये १०० प्रकरणात रुपये ८,५१,१००/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली असून, २३ गुन्हे दाखल केले आहेत, तसेच २८ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील मोहोळ तालुक्यात वाळूच्या वाहतुकीमुळे रस्ते खराब झाल्याबाबत**

**(१०) १०२९९ (०८-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील मोहोळ तालुक्यात वाळूच्या वाहतुकीमुळे रस्ते खराब झालेले असून जोपर्यंत रस्ते दुरूस्त करण्यात येत नाहीत, तोपर्यंत वाळूची वाहतुक बंद करावी या मागणीसाठी तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चाच्या शिष्टमंडळाने निवेदन देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात गेले असता तेथे पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त असतांना प्रशासनाने खाजगी सुरक्षा रक्षक म्हणून मल्लांना सुध्दा बंदोबस्तासाठी नेमले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त असतांना खाजगी मल्लांना तैनात करण्याची कारणे काय आहेत,

(४) मोर्चाच्या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-१२-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) खाजगी सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले नव्हते.
(४) शासन निर्णय दि.१२.३.२०१५ मधील तरतुदीनुसार वाळूच्या लिलावाकरीता ग्रामसभेची शिफारस मागविण्यात येते. संबंधित ग्रामपंचायतीकडून १५ दिवसाच्या कालावधीत निर्णय प्राप्त न झाल्यास, ग्रामसभेची मानीव सहमती आहे असे गृहीत धरुन, तसचे ग्रामसभेने लिलावास सहमती दर्शविली नसल्यास उपविभागीय अधिकारी यांच्याकडून विशेष ग्रामसभा आयोजित करुन, गुणवत्तेवर निर्णय घेऊन वाळू लिलावाची शिफारस केल्यास, लिलाव प्रक्रिया करण्यात येते.

वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रस्ते खराब झाल्याची बाब दृष्टोत्पत्तीस आल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्ती कामाची अंदाजपत्रके मागविण्यात येऊन, गौण खनिज स्वामीत्वधनातून ग्रामपंचायत अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून सदर रस्त्याच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण तालुक्यात (जि.रत्नागिरी) चोरी छुपे वाळू उपसा व वाहतूक सुरु असल्याबाबत**

**(११) १०६६५ (०८-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण तालुक्यात (जि.रत्नागिरी) शासनाने वाळू उपशावर बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बंदीमुळे तालुक्यात बेकायदा वाळू उत्खनन व वाहतूक मोठया प्रमाणात होत असल्याने चिपळूण शहरासह पूर्ण तालुक्यातील बांधकामावर त्याचा विपरित परिणाम झाला असून बांधकामासाठी वाळू अत्यावश्यक असल्याने बेकायदेशर वाळू उपसा व वाहतूक होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, चिपळूण शहरासह तालुक्यातील वाळू उपसा बंदी तातडीने उठविण्यात यावी, याकरिता वाळू व्यावसायिकांनी व नागरिकांनी शासनाकडे वारंवार मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे ,
(५) अद्यापही निर्णय घेतला नसल्यास, त्यांची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१), (२), (३) व (४) मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे यांनी सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/ रेती उत्खननासंदर्भात धोरण निश्चित करण्याची आवश्यकता केली

होती. २९ मे २०१४ च्या आदेशान्वये विशद केली होती. त्यानुसार शासनाने यासंबंधीचे धोरण, शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१५ अन्वये विहित केले आहे. सदर धोरणातील तरतुदींनुसार सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती उत्खननासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

चिपळून तालुक्यात वाळूचे अवैध उत्खनन/ वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. त्याअनुषंगाने वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीस पूर्णत: प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उप विभागीय अधिकारी, तहसिलदार पोलीस निरीक्षक यांना भरारी पथके/ चेकनाके नियुक्त करण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. सदर भरारी पथकांमार्फत चिपळूण तालुक्यामध्ये एप्रिल, २०१५ ते मे, २०१५ या कालावधीत केलेल्या कारवाईत २१ प्रकरणांत दंडात्मक कारवाई करुन रु. ३,३९,०००/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामटेक (जि.नागपूर) येथे सर्व नियम डावलून**
**अवैधरित्या उत्खनन होत असल्याबाबत**

**(१२) ११११९ (०७-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथे सर्व नियम डावलून अवैधरित्या उत्खनन होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजीच्या सुमारास तहसिलदार यांची भेट घेऊन संबंधित ठेकेदारांवर कडक कारवाई करण्यासंदर्भात निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती ठेकेदारांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-१२-२०१५) :**(१) मौजे रामटेक (सर्वे क्र. १९४) व मौजे चिंचाळा (सर्वे क्र.३११/१ब) ता.रामटेक येथून मुरुपाचे अवैध उत्खनन केल्याचे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजीचे निवेदन प्राप्त झाले हे खरे आहे.

(३) मौजे रामटेक येथील मुरुमाच्या अवैध उत्खननाबाबत एका व्यक्तींविरुध्द रु.९२,०७,५८४/- व मौजे चिंचाळा येथील मुरुमाच्या अवैध उत्खननाबाबत एका व्यक्तीविरुध्द रु.३५,४७,९४४/- एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, दंडाच्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अलिबाग तालुक्यातील मेढेखार परिसरात पटनी पॉवर कंपनीने परवानगीपेक्षा अधिक जागा संपादित केल्याबाबत**

**(१३) ११८४९ (०४-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग तालुक्यातील मेढेखार परिसरात पटनी पॉवर कंपनीने ४०५ मेगावॅटचा औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प उभारताना दिलेल्या परवानगीपेक्षा जास्त जागा संपादित केली आहे असे २३ डिसेंबर, २०१४ वा त्यासुमारास निदेर्शास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शेतकरी व शासनाची फसवणूक केल्याबाबत कंपनी विरोधात शासनाकडून काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे साई (ता.पनवेल) येथील मे.आर्शिया लिमिटेड या कंपनीने बांध बंदिस्ती व कंपाऊंड वॉल करण्याबाबत**

**(१४) १३१९६ (१०-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साई (ता.पनवेल) येथील मे.आर्शिया लिमिटेड या कंपनीने बांध बंदिस्ती व कंपाऊंड वॉल करतांना आदिवासीवाडी व विरूध्द दिशेला असलेल्या शेतक-यांना जाण्या-येण्याचा कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध करून दिला आहे काय,

(२) असल्यास , सदर कंपनीने जे शेतकरी कंपनीच्या कंपाऊंड वॉलने अडकलेले आहेत त्यांना कोणता रस्ता उपलब्ध करून दिलेला आहे याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान एक लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने ८ वर्षापूर्वी प्रकल्प सुरू करतांना ज्या शेतक-यांकडून जमिनी खरेदी केलेल्या आहेत त्या शेतक-यांना एकरी ४ नोक-या लिखित स्वरूपात कबूल केलेल्या होत्या त्यापैकी किती शेतक-यांना नोकरी देण्यात आलेली आहे.

(४) असल्यास, साई गावातील ग्रामपंचायतीला किती ग्रामपंचायत कर कंपनीकडून मिळतो व त्याचा आजपर्यंत काय विनियोग झालेला आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१२-२०१५) :**(१) नाही.

(२) मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेले दि.९/२/२०१५ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार पनवेल यांनी मामलेदार कोर्ट अधिनियमाखाली दिलेल्या आदेशाविरुध्द मे.आर्शिया कंपनीने मा.उच्च

न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून मा.न्यायालयाने दि.८/१/२०१४ रोजीच्या आदेशान्वये तहसिलदार पनवेल यांचे आदेशास स्थगिती दिलेली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) कंपनीने सदर जमिनी खरेदी करताना एकरी ४ नोकऱ्या देण्याचा कोणताही लिखित करार केलेला नाही मात्र एकरी ३ नोकऱ्या देण्याबाबत समझोता उभयपक्षामध्ये करण्यात आलेला आहे. मौजे साई येथील ७७ शेतकऱ्यांची १५० एकर जमीन कंपनीने जमीन खरेदी केलेली आहे. त्यापैकी ७१ शेतजमीन मालकांच्या उमेदवारांना तसेच इतर साई ग्रामपंचायत हद्दीमधील १७२ ग्रामस्थांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत.

(४) ग्रामपंचायत साई यांना कंपनीकडून सन २०१०-२०११ ते सन २०१४-१५ पर्यंत रक्कम रु.१,३०,६७,७४४/- इतका कर मिळालेला असून, ग्रामपंचायत हद्दीमधील विकास कामे व इतर बाबीकरीता रक्कम रु.१,२३,५३,०९६/- इतक्या खर्चाचा विनियोग केलेला आहे.

---

**पोहरेगाव, ता.रेणापूर येथील गावातील घरावरुन गेलेली उच्चदाबाची विद्‌युत लाईन बदलण्याबाबत**

**(१५) १३३०५ (०८-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोहरेगाव, ता.रेणापूर येथील गावातील घरावरुन गेलेली उच्चदाबाची विद्‌युत लाईन बदलण्याबाबत ग्रामस्थांनी सहाय्यक अभियंता मराविकं, रेणापूर, जि.लातूर यांचेकडे गेल्या दोन वर्षापासून सतत मागणी करुनही अद्यापही सदर विद्‌युत लाईन बदलण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विद्‌युत लाईन बदलण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) सदर वाहिनी सुमारे २५ वर्ष्र्रापूर्वी कार्यान्वित केली असून त्यावेळी ही वाहिनी गावालगतच्या शेतातून जात होती. त्यावेळी लाईनच्या खाली कोणतेही बांधकाम झालेले नव्हते. सदर वाहिनी कार्यान्वित झाल्यानंतर नागरिकांनी त्यांच्याखाली घरे बांधली असल्यामुळे सदर वाहिनी स्थलांतरीत करण्याची अर्जदारांनी सदर कामे स्वखर्चाने परवानाधारक ठेकेदाराकडून करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या सूचना संबंधित अर्जदारांना दिलेल्या असून त्यांच्याकडून स्वखर्चाने हे काम करण्याबाबत अद्याप सहमती मिळालेली नाही. त्यामुळे याप्रकरणी महावितरणकडून पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्हा मावळ तालुक्यातील ग्रामपंचायतींना बांधकाम परवानगीचे अधिकार देण्याबाबत

**(१६) १५४४६ (०८-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा मावळ तालुक्यातील १९२ महसुली गावापैंकी आजपर्यंत १९ महसुली गावातील गावठाणाचा सिटी सर्व्हे केला असुन जागामालकांना भूमी अभिलेख कार्यालयाकडून मालकी हक्काचे नकाशे व उतारे देण्यात आले असून, ग्रामपंचायतीला बांधकाम नोंदणीचे अधिकार नसल्याने बांधकामे थांबली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सन २०१० या वर्षापासून गामपंचायतीच्या हद्दीत बांधकामाची परवानगी ही जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असल्यामुळे बांधकाम सुरु करणा-या ग्रामस्थांना बांधकाम परवानगीस अडचणी येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) बांधकाम परवानगी घेण्यासाठी ग्रामीण भागात गावठाणात राहणा-या नागरिकांसाठी सिटी सर्व्हे न झाल्याने मालकी हक्काचा उतारा व नकाशा न मिळाल्याने भूमिपुत्रांना बांधकाम परवान्यापासून वंचीत रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास ग्रामस्थांनी मागणी होत असल्यामुळे ग्रामपंचायतींना बांधकाम परवानगीचे अधिकार देणे बाबत शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) गावठाण हद्दीबाहेरील बांधकामास परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस नाहीत. “पुणे” महानगर प्रदेश विकास क्षेत्र” यांच्या कार्यक्षेत्रबाबत सदर अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास क्षेत्र यांना आहेत. संपुर्ण मावळ तालुका सदर प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात आहे. ज्या ठिकाणी प्रारुप प्रादेशिक योजना किंवा मंजूर प्रादेशिक योजना प्रसिध्द झाली नाही, अशा ठिकाणी गावठाणातील बांधकामांना पंचायतीची परवानगी आवश्यक असून, त्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अडीच हजार शेतकऱ्यांची ३८ हजार एकर जमीन सरकारजमा करण्यात आल्याबाबत

**(१७) १६२९८ (२२-०६-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंबोली, चौकूळ आणि गेळे या तीन गावातील २५०० शेतकऱ्यांची ३८,००० एकर जमीन वहिवाटदारांची नावे काढून, सरकारच्या नावावर करण्यात आल्याची बाब एप्रिल, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून व त्याअनुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५)** :(१), (२) व (३) सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी तालुक्यातील मौजे आंबोली, चौकुळ व गेळे या गावामधील कबुलायतदार गावकर म्हणून नोंद असलेल्या जमिनीच्या महसूल अभिलेख्यामधील कबुलायत गावकर म्हणून झालेली झालेली नोंदी काढून त्या जमिनी शासन जमा करण्यात याव्यात आणि तद्‌नंतर सदर जमिनीवरील प्रत्यक्ष वहिवाटीसंदर्भात नव्याने चौकशी करुन ज्या व्यक्तीना त्यांच्या वाटीवाटीखालील जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ मधील तरतूदीनुसार भोगवटामुल्य व आकारता जमिनीच्या शेतसा-याच्या २०० पट रक्कम आकारुन वाटप करण्यात याव्यात असा निर्णय शासन ज्ञापन दि. १०/५/१९९९ अन्वये व शुध्दीपत्रक दि.१२/६/२००० अन्वये घेण्यात आला असून पात्र व्यक्तींना वरीलप्रमाणे जमीन वाटप केल्यानंतर शिल्लक जमिनीचे सर्व्हेक्षण करुन ज्या जमिनी पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यास योग्य आढळून येतीत त्या पर्यटन विभागास हस्तांतरीत करण्यात याव्यात व उर्वरित जमिनीचे सर्व्हेक्षण करुन ज्या जमिनी पर्यायी वनीकरणासाठी व संरक्षण व व्यवस्थापनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील त्या जनिनी लँड बँकमध्ये समाविष्ट करण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. सदरबाबत जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग येथे दि.अपिल क्र. ३८/२०१४ दाखल असून बाब न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### डहाणू ते जाफराबाद (जि.पालघर) दरम्यानच्या भागातील मच्छीमारांच्या जाळ्यांची मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत

**(१८) १६४१७ (१०-०८-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मत्स्य संपदेची खाण समजल्या जाणाऱ्या डहाणू ते जाफराबाद (जि.पालघर) दरम्यानच्या भागातील ६० ते ७० नॉटीकल मैलावर ओएनजीसीची महाकाय जहाजे सर्वेक्षण करीत असल्याने आसपासच्या मासेमारी करणा-या मच्छीमारांच्या जाळ्यांची मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मच्छिमार संस्थांनी नुकसान भरपाईचे प्रसताव ओएनजीसी कडे पाठवले असून याप्रकरणी शासनाने हस्तक्षेप करुन त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-११-२०१५)** :(१) होय, मच्छिमारांकडून तक्रार अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२) नुकसान भरपाई मिळण्यासाठी ओ.एन.जी.सी. कडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तथापि ओ.एन.जी. कंपनीने याबाबत सर्व्हे करण्याचे कंत्राट दिलेल्या western Geco या कंपनीने सदर क्षेत्रात सर्व्हेचे काम करण्यात आले नसल्याने नुकसान भरपाई देता येणार नसल्याचे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर तहसिल कार्यालयाने गौण खनिज, उपकर मुद्रांक शुल्कची रक्कम गौण खनिज नसलेल्या ग्रामपंचायतींना सरसकट वाटप केल्याबाबत

**(१९) १६५३२ (१६-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर सोलापूर तहसिल कार्यालयाने गौण खनिज असलेल्या व गौण खनिज नसलेल्या ग्रामपंचायतीना गौण खनिज, उपकर मुद्रांक शुल्काची रक्कम सारखाच प्रमाणात वाटप केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी चुकीच्या पध्दतीने वाटप केलेल्या निधीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशी अंती संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-१२-२०१५)** :(१), (२) व (३) उत्तर सोलापूर तालुक्यात मोठी नदी नसल्याने वाळू पासून शासनास महसूल मिळत नाही. परंतु इतर तालुक्यातील अनधिकृत वाळू उत्खनन करुन, या तालुक्यातील कार्यक्षेत्रातून होणाऱ्या वाहतूकीवरील दंडाची व स्वामित्वधनाची रक्कम आणि या तालुक्यातील दगड खाणी व भुरुम-माती पासून मिळणाऱ्या गौण खनिजाच्या स्वामित्मधनाची रक्कम शासनास जमा करण्यात येते. तालुक्यातील सर्व गावांचा विकास व्हावा याद्दष्टीने ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या उपकराच्या अनुदानाचे सर्व गावांना समान वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वीज चोऱ्या रोखण्यासाठी शासनाने आठ हजार व्यवस्थापक नेमणार असल्याबाबत**

**(२०) १६७४० (०६-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज चोऱ्या रोखण्यासाठी शासनाने आठ हजार व्यवस्थापक नेमणार असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयानुसार फिडर व्यवस्थापकाची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-११-२०१५) :**(१) वीज वाहिनीवरील तांत्रिक व वाणिज्यिक हानी कमी करण्याच्या उद्देशाने फिडर व्यवस्थापक ही योजना प्रायोगिक तत्वावर महावितरण कंपनीकडून सुरु करण्यात आली आहे. या योजनेची मार्गदर्शक तत्वे व सूचना महावितरण कंपनीकडून सर्व क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रायोगिक तत्वावर प्रती परिमंडळ १० फिडर निवडण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्यानुसार आतापर्यंत एकूण १६१ फिडरची निवड करण्यात आली आहे. त्यापैकी हिंगाली मंडळांतर्गत ३ अमरावती मंउळातंर्गत १, परभणी मंडळातंर्गत २ व जळगांव मंडळांतर्गत १ अश्या एकूण ७ वाहिन्या फिडर व्यवस्थापकास पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

---

**हिवरखेड/तेल्हार (जि.अकोला) येथील वीजजोडणी न मिळाल्याने शेतक-यांने महावितरण कार्यालयात किटकनाशक प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत**

**(२१) १७१४३ (०६-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरखेड/तेल्हार (जि.अकोला) येथील वीज जोडणी करुन न मिळाल्याने विनोद रामदास खारोडे (२४) या शेतक-यांने दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास महावितरण कार्यालयात किटकनाशक प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शेतक-याना व इतर शेतकरी वर्गाला तातडीने वीज जोडणी करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे.
(३) श्री.रामदास खारोडे यांना तातडीने वीज पुरवठा करण्याकरिता विशेष बाबी अंतर्गत उच्चदाब, लघुदाब वाहीनी व रोहीत्राचे काम करण्यात आले असून दिनांक ६ सप्टेंबर, २०१५ रोजी सदर वीज पुरवठा सुरु करण्यात आला, तसेच उर्वरीत शेतकऱ्यांना वीज पुरवठा देणेकरिता शासनाच्या विशेष पॅकेज अंतर्गत मंडळ स्तरावर निविदा काढण्यात आल्या असून पुढील प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (ता.जि.बुलढाणा) येथे कोतवाल पदभरती परिक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत**

**(२२) १७३०९ (१०-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नुकत्याच झालेल्या कोतवाल पदभरती परिक्षेत मर्जीतील उमेदवारांची नेमणुक झाली असल्याने याबाबत कोतवाल संघटनेने गैरप्रकार झाल्याचा आरोप करुन सदरची भरतीप्रक्रिया रद्द करुन नव्याने परिक्षा घेण्याची मागणी केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेहकर (ता.जि.बुलढाणा) येथे कोतवालाची पदे रिक्त पदे भरतांना निवड समितीने नियमा न घेता न भिन्न पध्दतीचे जाहीरनामे तथा पेपर काढून त्यात वेगवेगळ्या अटी लावून तहसील तथा तलाठी कार्यालयातील आपल्या मर्जीतील उमेदवारांची निवड केली हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गैरप्रकार करण्याऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांनवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-११-२०१५)** :(१), (२), (३) व (४) बुलढाणा जिल्ह्यामध्ये कोतवाल पद भरती परीक्षेत मर्जीतील उमेदवाराची नेमणूक झाल्याबाबत सदरची भरती प्रक्रिया रद्द करुन नव्याने परीक्ष घेण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटना यांनी दिनांक १४ मे, २०१५ रोजीच्या निवेदनान्वये केली होती, सदर भरती प्रक्रीयेची कार्यवाही नियमानुसार पूर्ण झाली असल्याने भरती प्रक्रीयेमध्ये कोणताही गैर प्रकार झालेला नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार माजी खंडकरी यांचे वारसांना जमीन वाटपाचे काम थांबविल्याबाबत**

**(२३) १७३२५ (०६-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.काशिराम पावरा (शिरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात दोन वर्षापुर्वी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाने शेती मंडळातील जमिन माजी खंडकरी यांचे वारसांना सुरु करण्यात आलेले वाटपाचे काम पूर्ण करण्यापूर्वीच जमीन वाटपाचे काम थांबविण्यात आल्याचे माहे मे, २०१५ वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार खंडकरी वारसांना जमीनेचे वाटप त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) असे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वेल्हा (ता,जि.पुणे) येथील नागरी सुविधा केंद्र कोणतीही पुर्वसूचना न देता अचानक सील केले असल्याबाबत**

**(२४) १७६०५ (०६-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हा (ता.जि.पुणे) येथील नागरी सुविधा केंद्राला कोणतीही पुर्वसूचना न देता अचानक सील केले असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नागरी सुविधा केंद्रातून दिल्या जाणा-या सेवासाठी शुल्क शासन नियमापेक्षा जादा घेत असल्याचे कारण पुढे करुन सदरहू केंद्र संबंधित तहलिसदारांनी त्यांच्या अधिकारात सील करुन कार्यालयातील कर्मचा-यांना अर्वाच्य भाषा वापरुन कार्यालयातून हाकलून दिले, हे खरे आहे काय,

(३)असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्या नुसार संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) सदर नागरी सुविधा केंद्र चालविणारी व्यक्ती शासनाने विहिती केलेल्या रकमेपेक्षा जादा शुल्क घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सदरचे नागरी सुविधा केंद्र दि.२७/०४/२०१५ रोजी सायं. ७.०० वाजता तपासणी करण्याकरिता बंद करण्यात आले होते.

तथापि, तेथील कर्मचाऱ्यांना अर्वाच्य भाषा वापरुन कार्यालयातून हाकलून दिले हे खरे नाही. नागरीकांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर केंद्र तपासणी करुन दुसऱ्या दिवशी सकाळी ११.३० वाजता सुरु करुन सेतू चालक यांचे ताब्यात देण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील मुंब्रा, रेतीबंदरच्या किनाऱ्यावर चौपाटी विकसीत करण्याबाबत**

**(२५) १७८७० (१०-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मुंब्रा, रेतीबंदरच्या किनाऱ्यावर चौपाटी विकसीत करण्याचा प्रस्ताव दिनांक १ मे, २०१५ रोजी जिल्हाधिकारी ठाणे याच्यासमवेत बैठक घेऊन तयार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच येथील राहिवासांच्या पुनर्वसनासंदर्भात आतापर्यंत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-११-२०१५)** :(१) ठाणे येथील मुंब्रा रेतीबंदर किनाऱ्यावर चौपाटी विकसीत करण्याबाबत दिनांक १ मे, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यासमवेत बैठक घेऊन प्रस्ताव तयार करण्यात आला हआहे. हे खरे नाही. तथापि, ठाणे जिल्ह्यातील कळवा आणि मुंब्रा येथील खाडी किनारा अतिक्रमणमुक्त करुन सुशोभीकरण करण्याचा जिल्हा प्रशासनाचा प्रस्ताव आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भुमि अभिलेखा खात्यामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना मागील चार महिन्यापासून वेतन दिलेले नसल्याबाबत**

**(२६) १७८७७ (१०-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भुमि अभिलेखा खात्यामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना मागील चार महिन्यापासून वेतन दिलेले नसल्याची गंभीर बाब मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-११-२०१५)** :(१) व (२) भूमि अभिलेख विभागातील विविध संवर्गातील एकूण ९३९७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. त्यापैकी २११२ पदे अस्थायी असून शासन निर्णय, दिनांक २१.५.२०१५ अन्वये दि.१.३.२०१५ ते २८.०२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानंतर या पदांवरील सर्व कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेण (जि.रायगड) तालुक्याच्या हद्दीत संरक्षित वनांचा दर्जा असलेल्या कांदळवनांची जेएसडब्ल्यू या कंपनीने धरमतर खाडीजवळ बंदर विकसीत करताना विनापरवानगी तोड केल्याबाबत**

**(२७) १८४०३ (१७-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि.रायगड) तालुक्याच्या हद्दीत खारमाचेला गट क्र.९४ मधील संरक्षित वनांचा दर्जा असलेल्या कांदळवनांची जेएसडब्ल्यू या कंपनीने धरमतर खाडीजवळ बंदर विकसीत करताना विनापरवानगी तोड केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कांदळवनांच्या तोडीबाबत कंपनीविरोधात माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वडखळ पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई करण्यास आली आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१२-२०१५)** :(१), (२) व (३) मौजे खारमाचेला गट नं. ९४ या सरकारी खाजण जमिनीमधील सुमारे २८ ते ३० कांदळवन वृक्षांची तोड करण्यात आलेली असून जेएसडब्ल्यू स्टील कंपनी व्यवस्थापकांविरुध्द वडखळ पोलीस स्टेशन येथे दि.१०/४/२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

---

**मौजे देगाव (वा) (ता.माहोळ, जि.सोलापूर) येथे महावितरण कंपनीचा विद्‌युत ट्रान्स्फार्मर शॉर्टसर्किट होऊन लागलेल्या आगीत फळाची मोठमोठी झाडे, ठिबकाचे साहित्य, पाईप लाईन, वॉल आदि जळून खाक झाल्याबाबत**

**(२८) १८४५५ (०६-०८-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देगाव (वा) (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथे महावितरण कंपनीचा विद्‌युत ट्रान्स्फार्मर शॉर्टसर्किट होऊन दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी लागलेल्या आगीत गट नंबर ३१३ मधील विविध फळाची मोठमोठी झाडे, ठिबकाचे साहित्य, पाईप लाईन, वॉल आदि जळून खाक झाल्याने सुमारे ५ लाख रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी वादळी वाऱ्यामुळे मोहोळ तालुक्यातील देगांव वाळून येथील गट नं. ३१३/२ या शेतातील सिंगल फेज (३x२५ केव्हीए) हरीजन वस्ती ग्रुप ट्रान्सफॉर्मरचा लघुदाब वाहिनीच्या कट-पॉईन्टवरील जपरवर स्पार्किग होऊन खाली असलेल्या वाळलेल्या गवताने पेट घेतला. सदर घटनेमुळे शेतात असलेल्या फळाच्या झुडपांना आगाचीच्या झळा लागल्या परंतु फळाच्या झुडपांचे कोणत्याही प्रकरचे नुकसान झाले नाही. साधारणत: ०२.३० एकर क्षेतफळातील ठिंबक सिंचन पाईप जळाल्याचे आढळले.

(२) महावितरण कंपनीने याप्रकरणाची चौकशी केली आहे.

(३) घटनास्थळाच्या पाहणीनुसार घटनेच्या वेळी जोराचे वादळ असल्यामुळे कट-पॉईन्टवर स्पार्किग होऊन खाली असलेल्या वाळलेल्या गवताने पेट घेतला असावा. त्यामुळे चिकू. चिंच इत्यादी झाडांच्या पानांना झळ लागलेली आढळली. परंतु फळझाडांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. साधारणत: २.३० एकर क्षेत्रफळातील ठिंबक सिंचन पाईप जळाल्याचे आढळले.

सदर घटनेशी संबंधित शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज व आवश्यक कागदपत्रे महावितरण कंपनीस प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत कंपनीकडे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा तालुक्यातील बेळवंडी येथील शेती महामंडळाची सुमारे १२०० एकर जमीन प्रचलित नियम डावलून एका बड्या कंपनीला देण्याबाबत**

**(२९) १८८९८ (१२-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेळवंडी (ता.श्रीगोंदा) येथील शेती महामंडळाची सुमारे १२०० एकर जमीन प्रचलित नियम डावलून एका बड्या कंपनीला देण्याच्या निषेधार्थ शेती बचाव कृती समितीचे अध्यक्ष श्री.राजेंद्र काकडे यांच्या नेतृत्वाखाली बेलवंडी येथील शेतीमळा कार्यालयासमोर दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास धरणे धरण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन शेतकऱ्यांना कसण्यासाठी देण्यात यावी अशी त्या भागातील शेतकऱ्यांनी मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त जमीन शेतकऱ्यांना कसण्यासाठी देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची बेळवंडी मळ्यातील खंडकऱ्यांना वाटून शिल्लक राहिलेली एकूण १३९७ एकर जमिन संयुक्त शेती पध्दतीने देण्यासाठी नियमानुसार निविदा प्रक्रीया राबवून मे. श्रीकृष्णा इंडस्ट्रीज, औरंगाबाद यांची निवड करुन त्यांच्यासोबत संयुक्त शेतीसाठी करारनामा करण्यात आला आहे. श्री. राजेंद्र काकडे यांनी दिनांक २३/३/२०१५ रोजी सदर करार रद्द करण्याची मागणी करुन आंदोलन करण्याची नोटीस दिली होती, तथापि, संयुक्त शेतीबाबतचा कारारनामा श्री. काकडे यांच्या निदर्शनास आणल्यावर त्यांनी आंदोलन स्थगित केले.

(४) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील वेगवेगळ्या मळ्यातील जमिनी संयुक्त शेती पध्दतीसाठी महामंडळाकडून हाती घेण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रीयेत शेतकऱ्यांनाही भाग घेण्याची सुभा आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महसुल विभागाच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात न आल्याबाबत**

**(३०) १९१७४ (०६-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) पिंपळगांव बसवंत येथील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्याचा निर्णय शासनाने २००९ साली घेऊन त्यानुसार

शासन निर्णय निर्गमित करण्यात येऊन ह्यासाठी ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करुन देण्याचा ठराव देऊनही गेल्या ६ वर्षात महसुल विभागाच्या प्रशासकीय दिरंगाईमुळे अद्याप उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढती लोकसंख्या लक्षात घेता रुग्णालया अभावी तेथील नागरीकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असुन राष्ट्रीय महामार्ग क्र.३ लगत असल्याने अपघाता मधील रुग्णांना तातडीने उपचार मिळण्याच्या दृष्टीने उपरोक्त ठिकाण उपजिल्हा रुग्णालयाच्या इमतारतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) व (२) सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांचे दिनांक ३१/८/२००९ चे शासन निर्णय अन्वये मौजे पिंपळगाव बसवंत ता.निफाड, जि.नाशिक येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यासाठी मंजूरी दिली आहे. सदर ग्रामीण रुग्णालयासाठी मौजे पिंपळगाव बसवंत येथील स.नं. ५८८ मधील ५ एकर जागा देण्याबाबतचा ठराव ग्रामपंचायत, पिंपळगाव बसवंत यांनी दिनांक २४/९/२००१ रोजी पारित केला आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने जिल्हा शल्यचिकीत्सव, नाशिक यांनी त्याचे पत्र दिनांक ४/२/२००९ अन्वये जागा मागणीचा विनंती अर्ज जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर केला आहे. सदर प्रस्तावावर इतर संबंधित विभागांची ना हरकत दाखले / अिभप्राय घेऊन जमीन प्रदान विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील तहसिल कार्यालय पुणे बोपोडी, औंध, एरंडवणे या भागातील १९५० पर्यंतच्या जन्ममृत्यूच्या नोंदी आढळत नसल्याबाबत

**(३१) १९२३७ (१६-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील तहसिल कार्यालय पुणे बोपोडी, औंध, एरंडवणे या भागातील १९५० पर्यंतच्या जन्ममृत्यूच्या नोंदी आढळत नसल्याचे दिनांक ३ मे २०१५ रोजी माहिती अधिकारात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास पुणे शहरातील बोपोडी, औंध, एरंडवणे या भागातील अनुसूचित जाती, जमाती, भटक्या व विमुक्त जमाती व इतर मागासवर्ग जातीतील लोकांना जातीचा दाखला मिळविण्यासाठी सक्षम पुरावा मिळत नसल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशी काय आढळून आले त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यावर चौकशीअंती कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-१२-२०१५)** :(१) होय.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) यासंदर्भात तहसिलदार, हवेली व पंचायत समिती, हवेली यांच्याकडून घेण्यात आलेल्या अहवालानुसार प्रश्नाधीन गावातील जन्म मृत्यूच्या नोंदीचे अभिलेख तहसिल कार्यालय व पंचायत समिती यांच्याकडे उपलब्ध नाहीत. तसेच पुणे महानगरपालिकेकडील जन्म मृत्यूचे अभिलेख सन १९६१ साली आलेल्या पानशेत पुरामुळे अस्पष्ट झालेले आहेत. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव शहर, (जि.नाशिक) येथे B १ व B २ च्या मालमत्तेची नजराना रक्कम भोगवटादार रक्कम भरु शकत नसल्याबाबत**

**(३२) १९५४३ (०६-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव शहर, (जि.नाशिक) येथे B १ व B २ ची मोठ्या प्रमाणात मालमत्ता आहे परंतु नजराना रक्कम भरपुर असल्यामुळे भोगवटादार रक्कम भरु शकत नसल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू B १ व B २ ची नजराणा रक्कम माफ करुन जागा भोगवटादाराच्या नांवे करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५)** :(१) मालंगोव शहर जि.नाशिक येथे B १ व B २ मोठ्या प्रमाणात मालमत्ता आहेत. परंतु नजराणा रक्कम भरपुर असल्यामुळे भोगवटदार रक्कम भरु शकत नसल्याबाबत माहे मे, २०१५ चे सुमारास कोणतेही निवेदन जिल्हाधिकारी नाशिक यांचे कार्यालयात प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भडगांव तालुक्यातील (जि.जळगांव) वावडे तलाठी कार्यालय गेल्या तीन महिन्यापासून बंद असल्याबाबत**

**(३३) १९७४७ (०६-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगांव तालुक्यातील (जि.जळगांव) वावडे तलाठी कार्यालय गेल्या तीन महिन्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे तेथील ग्रामस्थांनी अनेक कामे खोळंबली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठयांची तातडीने नियुक्ती करणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-११-२०१५)** :(१), (२) व (३) भडगांव तालुक्यातील (जि. जळगांव) वावडे येथील नियमित तलाठयाची इतरत्र बदली झाल्याने सदर ठिकाणचा अतिरिक्त कार्यभार अन्य तलाठयाकडे सोपविण्यत आला आहे, अतिरिक्त कार्यभाराद्वारे वावडे येथील तलाठी कार्यालयाचे कामकाज सुरु आहे, सदर ठिकाणी नियमित तलाठी नियुक्त करण्याची कार्यवाही सुरु आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एलिफंटा बेटासाठी वीज पुरवठा करण्याकरिता निधीची कमतरता न होण्याबाबत**

**(३४) १९८४१ (१०-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एलिफंटा बेटासाठी वीज पुरवठा करण्याकरिता निधीची कमतरता भासू देणार नाही अशी मा.मुख्यमंत्र्यांनी घोषणा करुनही माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वीज पुरवठा खंडीत झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बेटाला कायमस्वरुपी वीज पुरवठा व्हावा याकरिता एमटीडीसी कडून शासनाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार करुनही अद्यापही कोणताच निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एलिफंटा बेटाला कायमस्वरुपी वीज पुरवठा करण्यासंदर्भात शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५)** :(१) या बेटावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत डिझेल जनरेटरद्वारे वीजपुरवठा केला जात आहे,
(२) हे खरे नाही,
(३) एलिफंटा लेणी (घारापूरी बेट) ता.उरण, जि.रायगड येथे विद्युतीकरण करण्यासाठीच्या प्रस्तावाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत दि. ११.९.२०१५ च्या पत्रान्वये महावितरण कंपनीने एमएमआरडीएला विनंतीकेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारत सरकारच्या दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योत योजना**
**व आर.पी.डी.एस.मार्फत उपकेंद्राची क्षमता वाढविणेबाबत**

**(३५) २०१९८ (१०-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत सरकारच्या दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योत योजना व आर.पी.डी.एस. (इन्फ्रा-३)अंतर्गत औसा मतदारसंघातील रामलिंग मृदगड (डोंगरगाव) येथे ३३ केव्हीचे उपकेंद्र, चिंचोली संय्याखान (ता.निलंगा) येथे ३३ केव्हीचे उपकेंद्रे, कासारशिरसी (ता.निलंगा) येथील ३३ केव्ही उपकेंद्राचे १३२ केव्ही मध्ये रुपांतर करणे, तुंगी ब्रु (ता.औसा) येथे ३३ केव्हीचे उपकेंद्र, लामजना (ता.औसा) येथील उपकेंद्राची क्षमता वाढविणे आदी कामाचा समाविष्ट करण्याबाबतची लेखी मागणी लोकप्रतिनिधीनी मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (लाप) लातूर यांचेकडे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१५ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,व या निर्णयानुसार काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे,
(२) मौ.रामलिंग मृदगड (डोंगरगाव) नजीक मदनसुरी उपकेंद्रामध्ये पॉवर ट्रॉन्सफॉर्मर क्षमतावाढ दीनदयाळ उपाध्यक्ष ग्राम ज्योती योजनेत व मौ.हालसी हत्तरणा येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेद्र दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती पुरवणी योजनेमध्ये प्रस्तावित करण्यात आले आहेत. मौ.चिचोली संय्याखान नजीक बोरसरी उपकेंद्रामध्ये पायाभूत आराखडा योजना २ अंतर्गत अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर व स्वतंत्र ११ के.व्ही वाहिनीवे काम प्रगतीपथावर आहे. मौ. कासार शिरशी २३ के.व्ही. उपकेंद्राचे रुपांतर १३२ के.व्ही. उपकेंद्र करणे तांत्रिक दृष्ट्या संयुक्तिक नाही. मौ तुंगी बुद्रुक नजीक ३३ के.व्ही. नागरसोगा उपकेंद्रामध्ये (अंतर ५ कि.मी) अतिरक्ति ५ एम व्ही.ए.पॉवर. ट्रान्सफॉर्मर अतिरिक्त पायाभूत आराखडा २ योजनेमध्ये प्रस्तावित करण्यात आलेला आहे. मौ लामजना येथील ३३/११ के.व्ही उपकेंद्रामधील दोन्ही ट्रान्सफॉमर वरील भार क्षमतेपेक्षा कमी असल्यामुळे तेथे क्षमतावाढ करणे सध्या गरजेचे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारज (ता.अंजनगाव सुर्जी जि.अमरावती) येथील शेतक-यांच्या**
**डी.पी.जळून संत्रा बागांचे नुकसान झाल्याबाबत**

**(३६) २०४६४ (०१-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारज (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथील शेतक-यांच्या डी.पी.जळून संत्रा बागांचे नुकसान झाल्याबाबत श्री.संत गाडगोबाबा सेभाभावी संस्थां अमरावती यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ रोजी संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे लेखी तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) श्री. संत गाडगेबाबत सेवाभावी संस्था अमरावती यांचे तर्फे सदर निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) होय. भंडारज (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांच्या वीज पुरवठा निमकाळे-२ या रोहित्रावरून केला जातो. सदरचे रोहित्र दि.२८.१०.२०१४ रोजी नादुरुस्त झाले होते ते दि. ०३.१२.२०१४ रोजी दुरुस्त करण्यात येऊन वील पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये संक्शन पंपाने नदी-नाले खाडीपात्रातील रेती उपसा करण्यास बंदी घातल्याबाबत**

**(३७) २०७१० (१०-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये संक्शन पंपाने नदी-नाले खाडीपात्रातील रेती उपसा करण्यास बंदी घातलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंब्रा रेतीबंदर, वेहळे, कशेळी, ब्रीज, मुंबई-नाशिक महामार्गालगतच्या खाडीपात्रता अवैध रेती उत्खनन करणाऱ्या ७ संक्शन पंपावर दिनांक ५ जून, २०१५ रोजीच्या सुमारास महसूल विभागाने धाडी घातल्या, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या धाडीमध्ये किती जणांनवर कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व गुन्हायाचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५)** :(१) मा.राष्ट्रीय हरीत न्यायधिकारणाने दिलेल्या आदेशानासुर सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण निश्चित केले असून, त्यामध्ये वाळू उपसा करण्यासाठी सक्शन पंपाचा वापर करण्यास परवानगी दिलेली नाही.
(२) व (३) महसूल विभाग व पोलीस विभागाने दि. ९.६.२०१५ रोजी मोजे कशेळी ब्रीज ते खारीगांव ब्रीज या दरम्यान होणा-या रेतीच्या अवैध उत्खननाबाबत कारवाई करुन ६ सक्शन पंप व १ बार्ज पकडण्यात आले. याबाबत ६ व्यक्तीविरुध्द भा.दं.वि कलम ३७९, ३४ अन्वये तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४८(७) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड तसेच कर्जत तालुक्यातील आदिवासीच्या हक्काच्या जमिनी त्यांना परत करण्याबाबत**

**(३८) २०९६२ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड तसेच कर्जत तालुक्यातील आदिवासीच्या हक्काच्या जमिनी ज्या व्यक्तींनी फसवणूक करून खरेदी केल्या आहेत, त्या जमिनी आदिवासींना परत करण्याचा निर्णय शासनाने माहे जून, २०११ मध्ये घेतला असून सदर निर्णयाची अंमलबजावणी अद्याप करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच आदिवासीच्या जमिनी परत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१२-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही, तथापि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ३६, ३६ अ तसेच महाराष्ट्र अनुसुचित जमातींना जमीन प्रत्यार्प्रित करण्यासाठी अधिनियम १९७४ अन्वये विनापरवानगी हस्तांतरित जमिनी आदिवासींना परत करण्याची तरतुद उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पानगाव ता.रेणापूर येथील तलाठी सतत गैरहजर रहात असल्याबाबत**

**(३९) २१०३९ (१०-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पानगाव ता.रेणापूर येथील तलाठी सतत गैरहजर रहात असल्याबाबत तेथील शेतकऱ्यांनी दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी आंदोलन करुन कार्यवाही करण्याची मागणी तहसीलदार, रेणापूर यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलाठी गैरहजर राहात असल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर तलाठयावर याप्रकणी कोणती कारवाई करण्यात आली आहे,वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-११-२०१५) :**(१), (२), (३) व (४) मौजे पानगाव ता.रेणापूर येथील तलाठी यांच्या सततच्या गैरहजेरीबाबत स्थानिक शेतक-यांनी मागणी केली होती. सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली असता. चौकशीअंती, संबंधित तलाठी, यांचे विरुध्द कार्यवाही करुन त्यांची एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्यात आली आहे. तसेच त्यांची तलाठी सज्जा पानगाव ता. रेणापूर येथून इतरत्र बदली करण्यात आलेली आहे.

---

**नवी मुंबई क्षेत्रातील गुरचरण आणि मसनवट जमिनीवरील**
**गोरगरीबांनी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत**

**(४०) २१२२० (०६-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रातील गुरचरण आणि मसणवट जमिनीवर गोरगरीबांनी गेल्या अनेक वर्षापासून घरे बांधली असून त्याठिकाणी ते वास्तव्य करीत आहेत सदरची घरे नियमित करुन मिळावीत म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.महसूल मंत्री महोदयांना जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाच्या वतीने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-११-२०१५) :**(१) नवी मुंबई क्षेत्रातील गुरचरण व मसनवट जमिनीवरील घरे नियमित करुन मिळण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.३१/०१/२०१५ च्या निवेदनान्वये मा.महसूल मंत्री महोदयांना केली आहे.

(२) व (३) सन्माननीय सदस्यांच्या निवेदनातील विनंतीच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त, कोकण यांनी जिल्हाधिकारी, ठाणे व जिल्हाधिकारी, रायगड यांना दिले आहेत.

---

**जवाहरनगर (जि.भंडारा) मौज परसोडी येथे राखीव भूखंडाची**
**परस्पर दोन वेळा विक्री करण्यात आल्याबाबत**

**(४१) २१२६८ (१६-०८-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहरनगर (जि.भंडारा) मौज परसोडी, साजा क्र. २ नूसार ग्रामपंचायत ठाणा पेट्रोलपंप अंतर्गत भूखंड क्र.६६ व ६७ अंतर्गत दिनांक ३० ऑगस्ट, २००३ नूसार उपविभागीय अधिकारी यांनी मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर ३८ प्लॉट तयार करण्यात आले असून, सदर प्लॉट हे दुसऱ्या व्यक्तीच्या नावाने असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त राखीव भूखंडाची परस्पर दोन वेळा विक्री करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार सदर भूखंडाचा घोटाळा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबनाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-१२-२०१५) :**(१) मौजे ठाणा त.सा.क्र.२ परसोडी ता.जि.भंडारा येथील भुमापन क ६६ व ६ अनुक्रमे क्षेत्र ०.६० व ०.४८ हे अशी एकूण १.०८ हे शेतजमीन निवासी प्रयोजनाचे अकृषक उपयोगात आणण्याकरिता उपविभागीय अधिकारी भंडारा यांनी त्यांचे आदेश दि.३०.४.२००३ अन्वये अर्ज़दार श्री.गणपत धोंडबा गोस्वामी व इतर रा.खरबी, ता.भंडारा यांना परवानगी दिलेली आहे.

(२), (३), (४) व (५) सदर जमिनीच्या मंजूर अकृषीक अभिन्यानुसार एकूण ३८ भुखंड पाडण्यात आलेले होते. सदर जमिनीच्या मंजुर अकृषीक अभिन्यानुसार एकूण ३८ भूखंडाचे क्षेत्र ६५१९.३३ चौ.मी. रस्त्याचे क्षेत्र ३१५९.६९ चौ.मी. व खुल्या जागेचे क्षेत्र ११२०.९८ चौ.मी. दर्शविण्यात आले होते. जमीन मालकाने सदर अभिन्यासातील ३८ भुखंडाची नोंदणीकृत विक्री पत्राद्वारे इतर व्यक्तींना विक्री केली आहे. खुल्या जागेचे व रस्त्याचे उक्त क्षेत्र स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याबाबत आकृषक परवान्यात अट असतांनाही जमीन मालकाने त्या क्षेत्रापैकी ३ भुखंडाच्या ४६६.२८ चौ.मी. एवढया क्षेत्राची विक्री केली. सदर भुखंड ज्यांनी खरेदी केले होते त्यांनी त्यांची पुन्हा विक्री केली.

उक्त विक्री करण्यात आलेल्या भूखंडाची फेर फार विषयक नोंद घेणाऱ्या मंडळ अधिकारी व तलाठयास निलंबीत करण्यात आले होते व त्याच्यावर नियमानुसार शिस्तभंगाविषयक कारवाई करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल नगरपरिषद विकास आराखड्यामध्ये विविध प्रयोजनासाठी राखून ठेवलेल्या शासकीय जमिनींचे हस्तांतरण नगरपरिषदेकडे करण्याबाबत**

**(४२) २१३५५ (१६-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नियमाप्रमाणे पनवेल नगरपरिषद विकास आराखड्यामध्ये विविध प्रयोजनासाठी राखून ठेवलेल्या शासकीय जमिनींचे हस्तांतरण नगरपरिषदेकडे करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय जमिनी नगरपरिषदेकडे हस्तांतरीत न झाल्यास जमिनीवर अतिक्रमणामुळे नगरपरिषदेच्या विकास आराखड्यामध्ये सार्वजनिक कामांसाठी भविष्यात जमिनी उपलब्ध न होवून विकासात्मक कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषदेकडे जमिनी हस्तांतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१२-२०१५) :**(१) जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयास अशा आशयाचे दि. २४/४/२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) व (४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दि.१३/५/२०१५ रोजी जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशनानुसार मुख्याधिकारी, पनवेल नगर परिष्रद यांनी दि.१९/५/२०१५ रोजी नगर परिषद हद्दीमधील मंजूर विकास योजनेमधील आरक्षित जमीन नगरपारिषदेकडे देणबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे सादर केलेला आहे. जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयाकडे सदर प्रस्तावाची छाननी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयात कृषी संजिवनी योजनेला मुदतवाढ देण्याबाबत**

**(४३) २१५२६ (०६-०८-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात कृषी संजिवनी योजनेला मुदतवाढ देण्यात यावी अशी शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कृषी संजीवनी योजनेला मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) कृषी संजीवनी योजनेस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयातील यावल व रावेर तालुक्यातील सेतु सुविधा केंद्र गत १ वर्षापासून बंद असल्यामुळे विद्यार्थी व नागरिकांची होणारी गैरसोय**

**(४४) २१५२७ (१०-०८-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल व रावेर (जि.जळगांव) तालुक्यातील सेतु सुविधा केंद्र गत १ वर्षापासून बंद असल्यामुळे विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीनुसार सेतू सुविधा केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१२-२०१५)** :(१), (२) व (३) यावल व रावेर (जि.जळगांव) सेतू सुविधा केंद्र जानेवारी, २०१५ ते एप्रिल २०१५ पर्यंतच्या कालावधीत बंद होते परंतु यावल तालुक्यात १५ व रावेर तालुक्यात १५ महा ई-सेवा केंद्र तालुक्यातील प्रमुख गावांच्या ठिकाणी सुरु असुन विद्यार्थ्यांना व नागरिकांना त्यांच्या गावालगतच दाखवल्याबाबतची सुविधा उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे महा ई-सेवा केंद्रामार्फत नागरिकांना /विद्यार्थ्यांना सेवा पुरविण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांची व नागरिकांची कोणतीही गैरसोय होत नाही. विद्यार्थ्यांची व नागरिकांची कोणतीही गैरसोय होत नसल्याने अगर सदर बाबतीत कोणाचीही तक्रार नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर शहरातील अतिक्रमण धारकांना मालकी हक्काचे पट्टे देण्यासाठी उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचे स्तरावर कार्यवाही सुरु असल्याबाबत

**(४५) २२१६० (१६-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहरातील १३,९४६ अतिक्रमण धारकांना मालकी हक्काचे पट्टे देण्यासाठी उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचे स्तरावर कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याचे लेखी उत्तर दि.१८/१०/२०१४ क्र.कपासू-२०१३/ प्र.क्र.९८/ ज-८ अन्वये मा.प्रधान सचिव (महसुल) यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचे स्तरावर कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, कार्यवाहीच्या अनुषंगाने चंद्रपूर शहरातील उक्त १३,९४६ अतिक्रमण धारकांना मालकी हक्काचे पट्टे देण्यात आले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-१२-२०१५)** :(१) हे खरे नाही.
नागपूर शहरातील दोन प्रकरणाविषयी क्र. कपायू २०१३/प्र.क्र.९८/ज-८ दि. १८.१०.२०१४ अन्वये नझूल भुईभाडयाबाबत माहिती कळविण्यात आली आहे.
(२), (३) व (४) अतिक्रमणाबाबत महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एलईएन १०/ २००१/प्र.क्र. २२५/ज-१, दि.०४.०४.२००२ नुसार क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**चंद्रपूर शहरातील तुकूम ते शास्त्रीनगर भागातून जाणारी ६६ के.व्ही व ३३ के.व्ही उच्च दाब वाहिनीला "आय.पी.डी.सी." योजने अंतर्गत भूमीगत करण्याबाबत**

**(४६) २२१६७ (०६-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील तुकूम ते शास्त्रीनगर भागातून जाणारी ६६ के.व्ही व ३३ के.व्ही उच्च दाब वाहिनीला "आय.पी.डी.सी." योजने अंतर्गत भूमीगत करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक २७.०३.२०१५ रोजी वा त्या दरम्यान सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मा.ऊर्जा मंत्री यांनी अधिक्षक अभियंता अति उच्च दाब स व सु.प्र.विभाग चंद्रपूर आणि कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि. कंपनी बाबुपेठ चंद्रपूर यांना आय.पी.डी.सी. योजनेमध्ये समावेश करण्याचे निदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने चंद्रपूर शहरातील तुकूम ते शास्त्रीनगर भागातून जाणारी ६६ के.व्ही व ३३ के.व्ही. उच्च दाब वाहिनीला "आय.पी.डी.सी." योजने अंतर्गत भूमीगत करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे,

(२) होय,

(३) एकत्मिक ऊर्जा विकास योजना अंतर्गत चंद्रपूर शहराकरीता रु. ३५.८८ कोटीचा प्रस्ताव केंद्रशासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला आहे, सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीच्या अंतीम टप्प्यात आहे, तुकूम ते शास्त्रीनगर भागातून जाणारी ३३ के.व्ही. उच्चदाब वाहिनी रोडलगत ७ कि.मी चे भुमिगत काम करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिवाजी अप्पाजी शिर्के रा.कर्जूले हर्या (ता.पारनेर जि.अहमदनगर) यांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण केल्याबाबत**

**(४७) २२८१५ (१०-०८-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजी अप्पाजी शिर्के रा.कर्जुर्ले हर्या (ता.पारनेर जि.अहमदनगर) याने कर्जुले हर्या येथील शासकीय पडीत जमिन गट क्र.८८२ मधील १० आर क्षेत्रावर केलेल्या अतिक्रमणाबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (राहुरी) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ मार्च, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे,

(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५)** :(१) शिवाजी अप्पाजी शिर्के, रा कर्जुले (ता.पारनेर जि.अहमदनगर) यांनी शासकीय जमिनीवर केलेल्या अतिक्रमणाबाबतच्या दिनांक ६ मार्च, २०१५ रोजीच्या निवेदनाचा शोध घेतला असता संगणक प्रणालीवर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२) (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाथरी तालुक्यातील (जि.परभणी) लिंबा तांडा येथील गावगुंडानी शेतकऱ्यांच्या जमिनीवर ताबा घेऊन पिके कापून नेल्याबाबत**

**(४८) २२८७० (०६-०८-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी तालुक्यातील (जि.परभणी) लिंबा तांडा येथील एकूण ११ कुटुंबाना १९८८ मध्ये मिळालेल्या कुळाच्या जमिनीवर त्या कुटुंबियाचे नाव सातबारा व फेरफारावर आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तांडयातील व्यक्ती ऊस तोडणीसाठी गेल्यानंतर गावगुंडानी त्या जमिनीवर ताबा घेऊन पिके कापून नेल्याची तक्रार दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास भारतीय बंजारा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी परभणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती गावगुंडाच्या विरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५)** :(१) व (२) महाराष्ट्र शेत जमीन (ज.धा.क्र.म) अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार मौजे लिंबा येथील अतिरिक्त ठरलेली जमीन सदर अधिनियमातील तरतुदीनुसार मौजे लिंबा येथील ११ व्यक्तींना एप्रिल १९८८ मध्ये वाटप करण्यात आली होती. त्यानुसार फेराफार क्र. ७९ द्वारे सदर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावी भोगपटदार वर्ग २ म्हणून ११ व्यक्तीची नावे दाखल करण्यात आली आहेत. त्यामुळे सदर जमिनीचा निर्धोक ताबा मिळावा याकरिता उपरोक्त व्यक्ती उपोषणास बसले होते. त्याबाबतचा अर्ज जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे सादर केला होता.
(३) व (४) प्रस्तूत प्रकरणी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण औरंगाबाद यांनी दिनांक ३०/८/१९८८ रोजीच्या आदेशाद्वारे उपरोक्त जमिन अतिरिक्त घोषित केल्याचा उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांचा आदेश रद्द करुन सदर प्रकरण नव्याने चौकशीसाठी उपविभागीय आधिकारी, हिंगाली यांच्याकडे पाठविण्याबाबत आदेश दिले. सदर प्रकरणी मौजे लिंबा येथील जमीन वाटप केलेल्या व्यक्तींनी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे उपरोक्त आदेश विचारात घेऊन सदर याचिका निकालात काढली आहे. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने प्रस्तूत जमीन

अतिरिक्त ठरल्याबाबतचे आदेश रद्द केल्याचे सदर जमीन वाटप केल्याचे आदेश रद्द झाले असून त्यानुसार उपविभागीय अधिकारी, पाथरी यांच्या स्तरावर नव्याने चौकशी सुरु असून त्यांनी दिनांक ३१/८/२०१५ रोजी फेराफार क्र.७९ दिनांक ९/५/१९८८ रद्द करण्याबाबत आदेश दिलेला आहे.

---

**कुकडहेटी, रत्नापूर, पाळसगाव जाट, गुंजेवाही (ता.सिंदेवाडी, जि.चंद्रपूर) या गावातील कोतवालाची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४९) २३४१६ (१६-०८-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडहेटी, रत्नापूर, पाळसगाव जाट, गुंजेवाही (ता.सिंदेवाडी, जि.चंद्रपूर) या गावातील कोतवालाची पदे रिक्त असल्यामूळे नागरिकांना माणसिक व आर्थिक त्रास सहण करावा लागत असल्याची माहिती दिनांक ५ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंदेवाही तालूक्यातील कुकडहेटी,रत्नापूर, पाळसगाव जाट गुजेवाही, या गावातील कोतवालाची रिक्त पदे भरण्याबाबत लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी च्रंद्रपूर उपविभागीय अधिकारी चिमूर जि. चंद्रपूर यांना लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-११-२०१५)** :(१) हे खरे नाही,

(२) विषयाधीन लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही,

(३) कुकडहेटी साजा मधील विमुक्त जाती (अ) प्रवर्गाकरीता आरक्षीत कोतवाल पदासाठी ऑगस्ट, २०१४ मधील आयोजित पदभरती प्रक्रीयेत विमुक्त जाती (अ) प्रवर्गामधून एकही अर्ज प्राप्त न झाल्यामुळे सदर पद रिक्त आहे,

तसेच रत्नापूर, पळसगाव जाट, गुंजेवाही येथील कोतवाल पदांचे नियुक्ती आदेश दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडाळ तालुक्यातील महावितरण कंपनीने बसविलेले विद्युत पोल, विद्युत वाहीनी, सप्लायर गार्ड, डीपी बॉक्स जीर्ण होऊन निकामी झाल्याबाबत**

**(५०) २३५४० (१०-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ तालुक्यातील महावितरण कंपनीने बसविलेले विद्युत पोल, विद्युत वाहीनी,

सप्लायर गार्ड, डीपी बॉक्स जीर्ण होऊन निकामी झाल्याने तालुक्यात वारंवार विज खंडीत होत असल्याने तत्काळ पावसाळ्यापूर्वी बदलावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी कुडाळ येथील अधिक्षक अभियंता माहे मे, २०१५ रोजी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने विदयुत पोल बदलण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) कुडाळ तालुक्यामध्ये पायाभूत आराखडा १ अंतर्गत ६८५ गंजलेले विद्युत खांब बदलण्यात आलेले आहेत, २०.१६ कि.मी वाहिनीच्या तारा बदलण्यात आलेल्या आहेत, १५० गाळयामध्ये गार्ड बसविण्यात आलेले आहेत, ७ वितरण पेटया बदलण्यात आलेल्या आहेत व उर्वरित ११.८४ कि.मी. वाहिनीच्या तारा बदलण्याचे काम प्रस्तावित आहे, तसेच कुडाळ तालुक्यात पायाभूत आराखडा-२ अंतर्गत देखभाल व दुरुस्ती योजनेचा कार्यारंभ आदेश देण्यात आला असून त्यामध्ये उच्चदाब वाहिनीचे ८० वीज खांब बदलणे, लघुदाब वाहिनीचे ८० वीज खांब बदलणे व जुन्या गंजलेल्या ४२ वीज वितरण पेटया बदलणे इत्यादी कामाचा समावेश करण्यात आला असून सदर कामे मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.